| | |
|---|---|
| MHST090007672016 | **नि.दि. मु. नं. १३९/२०१६**<br>**राजेंद्र पांडूरंग कदम**<br>**वि.**<br>**बादशाह युसूफ डफेदार वगैरे** |

<u>नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक १३९/२०१६ मधील निशाणी २५ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीने त्याचे विरुध्द झालेला विना कैफियत चौकशीचा आदेश रद्द होवून मिळणेकरिता व कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवून कैफियत अभिलेखावर घेणेस परवानगी मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादीच्या प्रस्तुत अर्जातील कथनांनुसार, प्रतिवादी हे वयोवृध्द असल्याने आवश्यक ती माहिती व कागदपत्रे मुदतीत न मिळाल्याने तसेच वकीलांशी संपर्क साधून दाव्यास कैफियत व ताकीद अर्जावर म्हणणे देण्यास विलंब झालेला आहे. सदरचा विलंब प्रतिवादी यांनी जाणुनबुजून केलेला नाही. प्रतिवादींची कैफियत व लेखी म्हणणे दाखल करुन घेतल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादीची कैफियत व म्हणणे न स्वीकारल्यास प्रतिवादीस त्यांचे न्याय हक्कांपासून वंचित रहावे लागणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. सबब प्रतिवादी यांची कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होवून व प्रतिवादी यांची कैफियत नाही असा झालेला आदेश रद्द होवून मिळणेकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करुन प्रतिवादीचा अर्ज नाकारला. वादीच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादींनी मुद्दामहून वादीचा पुरावा झाल्यानंतर हेतूपूर्वक उशीराने कैफियत दाखल करण्याचा अर्ज दिलेला आहे. प्रतिवादीने आजारी असलेबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे प्रतिवादीच्या अर्जास कोणतेही योग्य कारण नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

४. प्रस्तुतचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादीने मुदतीत कैफियत दाखल केलेली नाही. अभिलेखाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी याची कैफियत नाही असा आदेश दिनांक २०.१२.२०१६ रोजी पारीत झाला असल्याचे दिसून येत आहे. प्रतिवादीने अर्जामध्ये ते वयोवृध्द असल्याने मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही असे कथन केलेले आहे. परंतु प्रतिवादींनी अभिलेखावर त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे दिनांक २०.१२.२०१६ रोजी आदेश पारीत झाल्यानंतर प्रतिवादी यांनी न्यायालयात कैफियत का सादर केली नाही याबाबत प्रतिवादी यांनी कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही असे दिसून येते. परंतु नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता, प्रतिवादीला त्याची बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे दिसून येते. प्रतिवादीला त्याची कैफियत सादर करण्याची परवानगी

दिल्यास वादी याचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट प्रतिवादीला कैफियत सादर करण्यास परवानगी दिल्यास प्रस्तुतचा दावा गुणदोषावर चालून निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादीला त्याची कैफियत सादर करुन वादीच्या दाव्यास त्याची बाजू मांडण्यास संधी देणे न्यायोचित दिसून येत आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादीचा प्रस्तुतचा अर्ज (निशाणी २५) र.रु १०००/– वादीला देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादीला कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ करण्यात येतो. तसेच प्रतिवादीचे विरुध्द झालेला कैफियत नाही असा आदेश रद्द करण्यात येतो.

Digitally signed by SAMEER GOPAL GUNARI
Date: 2022.02.05 11:16:25 +05'30'

**दिनांक – ०३/०२/२०२२**
**ठिकाण – कोरेगांव**

**(समीर गोपाळ गुणारी)**
**दुसरे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर**
**कोरेगांव.**